e-news letter

Government of Maharashtra
Water Resources Department

# आयसीआयएस बुलेटिन
# ICIS Bulletin

Volume : II Issue : XII

April 2013

Editorial Board
Mrs.Purnima Desai, Ulhas Pujari,
Mrs. Shilpa Jadhav,
Mrs. Dhanashree Limaye

Our Vision
*Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

Editor
T. N. Munde
Executive Editor
Sharad Dabhadkar

## संपादकीय



ई जलसेवा (आयसीआयएस) अंतर्गतची निवडक अठरा मोड्युल्स १ मे २०१३ पासून कार्यान्वित करण्याचा निर्धार केला असून त्यादृष्टीने सर्व पीएमओ टिम कार्यरत आहे.

विशेष म्हणजे मागील महिन्यात नुतन प्रधान सचिव (लाक्षेवि) यांचेकडे आयसीआयएसचे पहिलेच सादरीकरण झाले. त्यांनी या प्रकल्पाच्या आतापर्यंत केलेल्या प्रयत्नांची नोंद घेवून आम्हा सर्वांना प्रोत्साहित केले. मार्च महिन्यात नाशिक, ठाणे व पुणे येथे प्रादेशिक स्तरावरील व मंडळ स्तरावरील मिशन (मॅनेजमेंट) टिमच्या कार्यशाळा संपन्न झाल्या. नाशिक येथे श्री. भामरे, कार्यकारी संचालक श्री. एच.एम.शिंदे, मुख्य अभियंता तर पुणे येथे श्री. एस.एम.उपासे कार्यकारी संचालक, श्री. अविनाश सुर्वे, मुख्य अभियंता व सर्व अधीक्षक अभियंता आवर्जून उपस्थित होते. ठाणे येथे सर्व अधीक्षक अभियंता व त्यांची टिम उपस्थित होती. कार्यशाळेला खुपच चांगला प्रतिसाद मिळाला व त्यामुळे आम्हा सर्वांचा उत्साह व जबाबदारी निश्चितच वाढली आहे. १८ मोड्युल्सची पुन्हा एकदा चाचणी घेऊन हे मोड्युल्स आता पोर्टल वर उपलब्ध होणार आहेत. ई प्रशासनाचा भाग म्हणून आता मासिक लेखा महालेखापाल कार्यालयाला ऑनलाईन सादर करावयाचा असून त्याचीही महत्वपूर्ण बैठक मुंबई येथे झाली. हेही काम नजिकच्या काळात पूर्ण होईल. १५ एप्रिल पासून मास्टर ट्रेनर्सचे प्रशिक्षण नाशिक व प्राथमिक प्रशिक्षण केंद्र औरंगाबाद येथे आयोजित करण्यात येत असून त्यासाठीचे नामांकन मागविण्यात आलेले आहेत. ई प्रशासन प्रकल्पाबाबत जागरुकता वाढविण्याच्या दृष्टीने दि. ५ व ६ एप्रिल रोजी सातारा, सांगली व कोल्हापूर येथे परिवर्तन व्यवस्थापन विभागामार्फत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली आहे. पुढील अंक हा द्वितीय वर्धापन व ई जलसेवा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठीचा विशेषांक म्हणून प्रकाशित करणार आहोत. तुम्हा सर्वांचे लेख अपेक्षित आहेतच. प्रतिसाद मिळेल असा विश्वास आहे.

ई चॅम्पियन्स यांनी ई प्रशासन व आय.सी.आय.एस. चे प्रशिक्षण त्यांच्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करून याबाबत जागरूकता निर्माण करावी व याचे वृत्त व फोटो आय.सी.आय.एस.बुलेटीन कडे पाठवावे. आपल्या मंडळाअंतर्गत प्रशिक्षण झालेल्या कर्मचाऱ्यांमधून संगणकाची आवड असणाऱ्यांची निवड करून नावे कोयना संकल्प चित्र मंडळास कळविण्यात यावीत.

मास्टर ट्रेनर्स यांचेकडे मंडळांतर्गत कर्मचाऱ्यांची प्रशिक्षणासाठी महत्वाची जबाबदारी देण्यात येणार असल्याने मास्टर ट्रेनर्सची नावे CPMT मार्फत सत्वर पाठवावी.

कार्यकारी संपादक

## Gearing up for Go live of 1st May 2013

Wg. cdmr. A.K.Shrinivas (Retd.)
Project Management Consultant (PMO)



Thought of sharing some of the activities that are taking place at PMO. You all must have heard that PMO team had successfully concluded short workshops for RPMT/CPMT members to make them functional across the State within a matter of one month which itself shows the keenness of PMO to create awareness and share information to all the members. Apart from the above major activity the PMO had planned to carry out partial go live as a soft launch with effect from 01 May 13. This launch would involve 18 modules and portal. These modules would be available for every individual officer across the State for porting data and start using the application. Who ever had ported the data can play with port-lets (reports) and also would be able to generate Crystal reports, reports that we need in a particular format.

We have been having various meetings with vendors throughout the month in order to bring all the requisite items to your doorstep as soon as possible. Like we have concluded agreement with BSNL for connectivity, LAN switches with HCL etc., Lot of strategizing has gone into creating a training strategy for training the master trainers of the application. We propose to start the master training facilitation by 15 Apr 13 at two places namely Nashik and Aurangabad. This would be an opportunity for all those who have been nurturing the idea of becoming a trainer in life. One should not miss this opportunity. You can nominate yourself or through your superiors and send the names to PMO or respective CPMT's who would then forward to PMO. I am looking forward to meeting you all soon on my visits to your offices as and when time permits and interact with all of you to come out with version -2 of the application which would be more interesting and would enable you all to use less paper in the office and contribute to environment.

All the best and wish you all well.

### *Congratulations for Remarkable work in Data Digitization*

| | | |
|---|---|---|
| Shri. Dindore G.R. | Executive Engineer | Jigaon Project |
| Shri. C. Godbole | Asst. Executive Engineer | Kudali Project |
| Shri. Kachkalwar S.H. | Asst. Executive Engineer | Upper Painganga Project |
| Shri. Kulkarni K.V. | Deputy Engineer | Upper Painganga Project |
| Shri. Kendre N.N. | Sect. Engineer | Upper Painganga Project |
| Shri. Kurlekar | Sect. Engineer | Upper Painganga Project |
| Shri. Kshirsagar S.A. | Asstt. Engineer II | Upper Painganga Project |
| Shri. Prakash Gaikwad | Asst. Engineer I | Dhom Balkawadi Project |
| Smt. Anita Mane | Asst. Engineer I | Urmodi Project |
| Mrs. Shilpa Alashi | Asst. Engineer I | Katepurna Project |
| Shri. Solanke | Asst. Engineer I | Katepurna Project |

*Please Keep it up !*

# लिनक्स उबंटू चा वापर



लिनक्स उबंटू आधारित कार्यप्रणाली ही अत्यंत उपयुक्त असून शासनाच्या विविध विभागामध्ये काम करताना प्रचलित window based O.S. कार्यप्रणाली पेक्षा सदरची कार्यप्रणाली ही अतिशय सोपी आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या कार्यप्रणालीमध्ये काम करताना टंकलेखन हे प्रामुख्याने युनिकोड मध्ये होत असल्याने दुसऱ्या कोणत्याही फॉन्टचा संबंध येत नाही व याद्वारे कोणतेही वर्ल्ड एक्सेल अथवा पॉवर पॉइंट मधील काम हे आपण दुसरीकडे सहजरित्या ओपन करू शकतो.

उबंटू मध्ये मराठी टंकलेखन करण्यासाठी बऱ्याच अडचणी येतात असा नेहमी विंडोजमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा समज आहे. तथापि हा गैरसमज आहे. मराठी अथवा कोणत्याही प्रादेशिक भाषेमधील टंकलेखन हे उबंटू मध्ये अतिशय सोप्या पद्धतीने करता येते. आयएसएममध्ये नेहमी टंकलेखन करणाऱ्या व्यक्तींसाठी पारंपारिक इनस्क्रिप्ट तसेच नवीन वापर करणाऱ्यांसाठी फोनेटिक पद्धतीने टंकलेखन करणे अत्यंत सोयीचे आहे. या प्रमाणे टायपिंग करण्यासाठी उबंटूमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे पद्धत वापरण्यात यावी. १. सर्वप्रथम संगणकावरील लॉंचर मधील ॲप्लीकेशन सुरू करावे. २. ॲप्लीकेशनमध्ये की-बोर्ड इनपुट मेथड सुरू करावे. (डायलॉग बॉक्स येईल) ३. Ibus Dasmon या पर्यायास एस करावे. ४. रन सिस्टीम (एडीएमएन) या पर्यायास ओके करावे. (यानंतर प्रेफरन्स चालू होईल. ५. आयबस प्रेफरन्समधील इनपूट मेथडमध्ये आपल्याला हवी ती भाषा (मराठी) निवडण्यात यावी. ६. यानंतर सदर डायलॉग बॉक्स बंद करावा.
७. बंद केल्यानंतर संगणकाच्या वरील उजव्या बाजूस इनपूट मेथड आयकॉन दिसू लागतो. सदर आयकॉन हा आपण निवडलेली भाषा व इत्यादी दर्शवितो. या आयकॉन वर क्लीक केल्यानंतर इनपुट मेथडची निवड आपल्याला करता येते. वरील पद्धतीचा वापर करून आपण उबंटू आधारीत कार्यप्रणालीमध्ये काम करू शकतो.

मी मागील सहा महिन्यापासून ही प्रणाली वापरत असून काही अडचण आल्यास मला संपर्क साधावा.

माणिक रा. वरेकर, स. अ. श्रेणी-२
मु.अ.कार्यालय जलविद्युत प्रकल्प पुणे
09420466476
manikwarekar@gmail.com

## मराठी फोनेटीक की-बोर्ड

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ` | ◌ॆ / ऐ | 1 | 1 / ऍ | 2 | 2 / ◌ॅ | 3 | 3 / ऑ | 4 | 4 / ◌ॉ | 5 | 5 / त्र | 6 | 6 / ज्ञ | 7 | 7 / & | 8 | 8 / श्र | 9 | 9 / ( | 0 | 0 / ) | '- | _ | '= | ,= / ,+ |
| | | Q | ओ / औ | W | ट / ठ | E | ◌ॆ / ◌ै | R | र / ◌ृ | T | त / थ | Y | य / य | U | ◌ु / ◌ू | I | ◌ि / ◌ी | O | ◌ो / ◌ौ | P | प / फ | [ | ड / ढ | ] | ऋ / ऱ |
| | | A | ◌ा / आ | S | स / श | D | द / ध | F | ◌्अ / अ | G | ग / घ | H | ह / ◌ः | J | ज / झ | K | क / ख | L | ल / ळ | ; | इ / ई | ' | उ / ऊ | | |
| | | Z | ङ / ◌ँ | X | ष / क्ष | C | च / छ | V | व / ळ | B | ब / भ | N | न / ण | M | म / ◌ं | , | , / त्र | . | । / ◌ | / | ए / ऐ | | | | |

टिप : • लाल रंगातील अक्षरांसाठी शिफ्ट की चा वापर करावा. • जोडाक्षरासाठी 'F' या की चा वापर करावा. जसे राष्ट्र R A X F W F R

स्वागत


श्री. नंदकुमार रणावरे


कु. अंजू सोंडवले


कु. शिल्पा जाधव

प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय पुणे येथे स. अ. श्रेणी १ चे पदस्थापनेवर श्री. नंदकुमार रणावरे, कु. अंजू सोंडवले व कु. शिल्पा जाधव यांची नेमणूक झाली असून त्यांनी प्रकल्प व्यवस्थापन विभागामध्ये जोमाने काम करण्यास सुरूवात केली आहे. त्यांचे मन:पूर्वक स्वागत व शुभेच्छा!

# प्रोजेक्ट मिशन टीम बैठक क्षणचित्रे





## *ICIS News & appeal*

1. workshop for pilot phase 2 modules (M9, M10, M11) has been conducted in pune region for SIPC, Satara & PIPC Pune.
2. Appericiation letter for speedy data digitisation has been sent to all concerned project Officers.
3. Crystal Reports are now available on the system. All the users are requested to check the reports & give the feedback.
4. As a part of awareness compaign workshops have been proposed at each district head quarters.
First such workshop will be held at Satara, Sangli & Kolhapur on 5th and 6 th April 2013.

*For any queries related to software, pl. contact Wipro Helpdesk on 08624957168*

### Be an ICIS e-news author......



We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day department activities.